अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार, दि.२० डिसेंबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : ७१ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

मराठा आरक्षणासाठी फेब्रुवारीत विशेष अधिवेशन घेणार

मुंबई : मराठा समाजाच्या आरक्षणासाठी फेब्रुवारी महिन्यात विशेष अधिवेशन घेणार असल्याची मोठी घोषणा मुख्यमंत्री शिंदे यांनी विधानसभेत केली.

क्युरेटिव्ह याचिका हा एक आशेचा किरण आहे. ज्या त्रुटी आहे त्या दूर करण्याचा प्रयत्न सरकार करत आहे. मराठा समाजाला कायद्याच्या चौकटीत बसवणारा आरक्षण देणार आहे. मागासवर्ग आयोगाच अहवाल एक महिन्यांत येईल. त्यानंतर फेब्रुवारी मध्ये विशेष अधिवेशन बोलावून आम्ही आरक्षण देणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले. मराठा समाजाला देखील या ठिकाणी आरक्षणाच्या माध्यमातून आपली प्रगती करायची आहे आणि त्यांचा अधिकार देखील आहे.

या मागणीसाठी काहीही भावनांच्या भरात अतिशय लोकांचे पाऊल उचलून आत्महत्या देखील केली असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत म्हटले.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत मराठा आरक्षणावर झालेल्या चर्चेला उत्तर दिले. विधानसभेत मराठा आरक्षणावर चर्चा झाली. या चर्चेत ७४ आमदारांनी १७ तास १७ मिनिटे चर्चा झाली. सर्व जाती पाती एकसमान आहे. सरकारसाठी हे एकसमान आहे. प्रत्येक घटकाला समान वाटा मिळाला पाहिजे. आरक्षण देण्यास सरकार कटीबद्ध असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले.

INDIAN PREMIER LEAGUE

मिचेल स्टार्क बनला IPL च्या इतिहासातील सर्वात महागडा खेळाडू

दुबई : विश्वविजेता ऑस्ट्रेलियाचा खेळाडू मिचेल स्टार्कने आयपीएलच्या इतिहासातील सर्व विक्रम मोडीत काढले आहेत. कोलकात्याने स्टार्कसाठी २४.७५ कोटींची ऐतिहासिक बोली लावून या खेळाडूला खरेदी केले आहे. यामुळे मिचेल स्टार्क आता आयपीएलच्या इतिहासातील सर्वात महागडा खेळाडू ठरला आहे. मिचेल स्टार्कसाठी चार संघामध्ये बिडिंग टेबलवर लढत झाली. मिचेल स्टार्कसाठी दिल्ली आणि मुंबई या दोन संघामध्ये आधी लढत झाली. मुंबईने माघार घेतली. पण त्याचवेळी गुजरातनेही रस दाखवला. कोलकाता आणि गुजरात या दोन संघामध्ये स्टार्कसाठी चुरस पाहायला मिळाली. अखेर कोलकात्याने स्टार्कला ताफ्यात घेतले. स्टार्कसाठी २४.७५ कोटी रुपये खर्च केले.

रचिन रवींद्रला २ कोटीही नाहीत....

क्रिकेट विश्वचषकात सर्वांचं लक्ष वेधून घेणारा न्यूझीलंडचा डॅशिंग सलामीवीर रचिन रवींद्रला अपेक्षित किंमत मिळाली नाही. रचिन रवींद्रला चेन्नई सुपर किंग्जने अवघ्या १.८० कोटी रुपयात संघात सामावून घेतलं.

कोणाच्या खात्यात किती रक्कम शिल्लक

चेन्नई – ११.६० कोटी, दिल्ली – २४.४५ कोटी, मुंबई – ८.१५ कोटी, पंजाब – १३.१५ कोटी, हैदराबाद – ३.६० कोटी, लखनौ – ६.७५ कोटी, गुजरात – ३१.८५ कोटी, कोलकाता – ६.९५ कोटी, राजस्थान – ७.१० कोटी, बंगळुरू – ११.७५ कोटी

हे खेळाडू राहिले अनसोल्ड...

स्टीव स्मिथ, करुण नायर, मनिष पांडे, रीली रॉसो, जोश इंग्लिस, फिल साल्ट, कुसल मेंडिस, तबरेज शम्सी, रशीद, वकार सलामखेल, मुजीब आर, रहमान, ईश सोढी, अकिल हुसैन

ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्सवर ठरला दुसरा सर्वाधिक महागडा खेळाडू

लिलावात आले तेव्हा त्याची बोली २ कोटी रुपयांच्या बेस प्राईजवर होती. पहिली बोली चेन्नई सुपर किंग्जने लावली आणि त्यानंतर मुंबई इंडियन्सनेही या खेळाडूला खरेदी करण्यात रस दाखवला. त्यानंतर आरसीबी आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात स्पर्धा झाली आणि अखेर पॅट कमिन्सची बोली २०.५ कोटींवर थांबली.



सोलापूरच्या आर्शिन कुलकर्णीची आयपीएलमध्ये एन्ट्री, लखनौकडून खेळणार

सोलापूरचा क्रिकेटपटू आर्शीन कुलकर्णी हा आता आयपीएल मध्ये खेळताना दिसणार आहे. मंगळवारी झालेल्या आयपीएल लिलावामध्ये अर्शिन कुलकर्णीला २० लाखांमध्ये लखनौ सुपर जाएंटस्ने विकत घेतले आहे. अर्शीनने भारताच्या अंडर १९ क्रिकेट संघात आपले स्थान मिळवले आहे. अर्शिनने अंडर–१९ आशिया कप २०२३ मध्ये भारताकडून अष्टपैलू कामगिरीचेफळ त्याला मिळाले आहे.

सोलापूरची 'नशा' देशभर फैलावतेय!

मोक्काच्या तपासात धक्कादायक माहिती

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

साऱ्या महाराष्ट्रात खळबळ माजवलेल्या ड्रग्ज तस्कारांचा प्रताप अजून थांबलेला नाही. मात्र,पोलिसांनी त्यांचा चांगलाच पिच्छा पुरवल्याने आजही कित्येक कोटींचे एमडी तपास अधिकाऱ्यांच्या हाती लागत आहे तसेच ड्रग्ज निर्मितीचे कारखानेही आढळत आहेत.यात सोलापूरही अपवाद नव्हते. राज्यात जे आरोपी सापडले,त्यांचे सोलापूरशी कनेक्शन होते हेही तपासात उघड झाले. सामनगाव येथील तस्करांनी सोलापुरात सुरू केलेल्या नशेच्या कारखान्यातून फक्त नाशिक, मुंबई, पुणे या जिल्ह्यांतच नव्हे, तर देशभरात एमडी पोहोचत असल्याची धक्कादायक माहिती 'मोक्का'अंतर्गत तपासात उघड झाली आहे.त्यामुळे एमडी प्रकरणात सोलापूरचे नाव देशभर चर्चेत आले आहे.

नाशिकच्या पोलिसांकडून या प्रकरणाचा छडा लावला जात आहे. उमेश वाघ या संशयिताने पोलिसांना यासंदर्भातील माहिती दिली आहे. त्यानुसार, संशयित सनी पगारे आणि अर्जुन पिवाल गँगसह इतरांना एमडी कारखाने सुरू करण्यास मदत करणाऱ्या संशयित फय्याज (पूर्ण नाव नाही) याचा माग पोलीस काढत आहेत. सामनगाव एमडी प्रकरणातील पंधरा संशयितांवर नाशिकचे तत्कालीन पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांनी 'मोक्का' लावला आहे. या प्रकरणातील संशयित सनी पगारे गँगने नाशिकमध्ये एमडी तस्करी सुरू केली. अर्जुन पिवालसह इतर साथीदारांमार्फत ही तस्करी राज्यभरात सुरू होती. त्यानंतर केरळच्या संशयितामार्फत रसायन खरेदी करून सनी याने सोलापुरात 'एमडी'चा कारखाना सुरू केला. एकाच वेळी शंभर किलोंपेक्षा अधिक एमडी तयार करण्याची त्याची क्षमता होती. मात्र, मोठ्या प्रमाणात एमडी बाजारात भरून तस्करी करण्याचा सल्ला देखील वाघ यानेच दिला होता. त्याने नाशिकसह इतर ठिकाणच्या एमडी कारखान्यांतही 'सल्लागारा'ची भूमिका बजावल्याचा पोलिसांना संशय आहे. दरम्यान, या सर्वांचा मास्टरमाइंड आणि एमडी विक्री करणारा मुख्य संशयित फय्याज असल्याची माहिती वाघच्या चौकशीत समोर आली आहे. नाशिकरोड विभागाचे सहायक पोलिस आयुक्त या प्रकरणी सखोल चौकशी करीत आहेत. त्यानुसार, फय्याजच्या मागावर काही पथके रवाना झाली आहेत.

अक्षय नाईकवाडे

येण्यापूर्वी नाशिक अमली पदार्थविरोधी पथकाने सोलापुरात धाड टाकली. या प्रकरणातील संशयित उमेश सुरेश वाघ (रा. विरार) याने कारखाने सुरू करण्याचा सल्ला दिला होता. त्यानुसार तस्करांनी हा 'उद्योग' केला. सनीच्या सोलापुरातील एमडी कारखान्यातील माल स्पीकर्समध्ये

१५ संशयितांवर मोक्कानुसार कारवाई

सामनगाव येथील संशयित गणेश शर्मा याच्याकडून नाशिकरोड पोलिसांनी साडेबारा ग्रॅम एमडी जप्त केले होते. त्यानंतर अंमली पदार्थ विरोधी पथकाने सापळा रचून या गुन्ह्यात दहाहून अधिक संशयितांची धरपकड केली. त्यातून एमडी तयार करण्यासाठी सोलापुरात उभारण्यात आलेल्या कारखान्यासह गोदामाचाही पर्दाफाश झाला. पोलिसांनी कोट्यवधी रुपयांच्या एमडीसह, कच्चा माल, एमडी तयार करण्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री हस्तगत केली. आतापर्यंत या गुन्ह्यातील १५ संशयितांवर मोक्कानुसार (महाराष्ट्र कंट्रोल ऑफ ऑर्गनाईजड क्राईम ॲक्ट)कारवाई करण्यात आली आहे.

ललितसह चौघे कारागृहात

शिंदे गाव एमडी प्रकरणातील संशयित ललित पानपाटील याच्यासह रोहित चौधरी, हरीश पंत, जिशान शेख या संशयितांना अमली पदार्थविरोधी पथकाने सोमवारी (दि. १८) जिल्हा आणि सत्र न्यायालयात हजर केले. न्यायालयाने चौघांना न्यायालयीन कोठडी सुनावली. त्यामुळे त्यांची रवानगी पुन्हा मुंबईतील आर्थररोड कारागृहात करण्यात आली. दहा दिवसांच्या पोलीस कोठडीत ललितने पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, महिन्यातील वीस दिवस कारखाना बंद असायचा. दोन हस्तकांमार्फत मुंबईत माल जायचा. त्या दोघांना पोलीस लवकरच ताब्यात घेणार आहेत.

सराईत आरोपी पाच राज्ये फिरला

सामनगाव येथून जप्त केलेल्या एमडी प्रकरणात सहभागी असलेल्या एका सराइताला अटक करण्यात गुंडा विरोधी पथकाला यश आले आहे. अक्षय गणेश नाईकवाडे (वय २७) असे संशयिताचे नाव असून, मध्य प्रदेशातील भोपाळ शहरातून त्याला ताब्यात घेण्यात आले. तीन महिन्यांपासून तो पोलिसांना गुंगारा देत होता. गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान, दिल्ली, उत्तराखंड अशा वेगवेगळ्या राज्यांमध्ये तो जात असल्याने पोलिसांच्या हाती लागत नव्हता. त्याचा भोपाळ येथील पत्ता शोधून त्यानुसार पथकाने भोपाळ गाठून नाईकवाडे याला भोपाळ रेल्वे स्टेशनबाहेरील झोपडपट्टी परिसरातील एका हॉटेलातून ताब्यात घेतले गेले. त्यामुळे या गुन्ह्यातील महत्त्वाच्या माहितीची उकल होण्याची शक्यता बळावली आहे.

मंगळवेढ्याच्या दामाजी कॉलेजच्या नोकर भरतीत घोडेबाजार

■ सहा उमेदवाराकडून प्रत्येकी ३० लाख घेतले

सुराज्य/पंढरपूर

श्री विद्या विकास मंडळ संचलित श्री संत दामाजी महाविद्यालय मंगळवेढा या संस्थेने नोकरी भरती करत असताना सहा उमेदवाराकडून प्रत्येकी ३० लाख रुपये घेतले असल्याचा गौप्यस्फोट संस्थेचे सचिव ॲड. रमेश जोशी यांना यांनी मंगळवारी पंढरपूर येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत केला.

बोगस सह्या व कागदपत्राच्या आधारे धर्मदाय आयुक्त यांच्या कार्यालयात बदल अहवाल सादर करून संस्थेचे सचिव जोशी व डॉ. अशोक सुरवसे यांना पदावर हटवून सदर कॉलेजमध्ये २० जून व २१ जून २०२३ रोजी नोकरीसाठी मुलाखती घेण्यात आल्या. नोकरी भरतीची प्रक्रिया ही अत्यंत बेकायदेशीर चुकीच्या पद्धतीने राबवली गेली. कोणत्या उमेदवाराची निवड करायची हे आधीच ठरवून लाखो रुपयांचा घोडेबाजार केला गेला या प्रक्रियेमध्ये नोकर भरतीचे कॉल लेटर पाठवण्यापूर्वीच याची कुणकुण मला लागली. त्यामुळे कॉल लेटर पाठवण्यापूर्वीच मी ३१ मे २०२३ रोजी सोलापूर विद्यापीठ कुलगुरू, शिक्षण संचालक, मुख्यमंत्री, राज्यपाल, यांना निवेदन पाठवून सदर

भरती प्रक्रियेत निवडलेले उमेदवार हे पैसे घेऊन अगोदर निवडले आहेत याची तक्रार निवेदनात केली, असे त्यांनी सांगितले.

या तक्रारीमध्ये या भरती घोटाळ्यात दामाजी कॉलेजचे प्राचार्य डॉ. एन .बी. पवार यांचा फार मोठा सहभाग आहे अर्चना कदम (इंग्रजी), जावेद तांबोळी(इतिहास) राजाराम पवार (भूगोल), राजकुमार पवार (मराठी), सरिता माने भोसले (कॉमर्स) व एक उमेदवार अक्कलकोट तालुक्यातील आहे या उमेदवाराकडून तुम्हाला नोकरी देतो म्हणून अगोदरच प्रत्येकी ३० लाख रुपये घेतले याचाच भाग म्हणून या कटकारस्थानामध्ये निवड समितीमध्ये कोण असणार हे देखील प्राचार्य पवार यांनी ठरवले होते ही समिती बेकायदेशीर असून आपण स्वतः कुलगुरूंनी लक्ष घालून निवड समिती नियुक्ती करावी अशी तक्रार मी केली होती शैक्षणिक क्षेत्राला काळे फासणाऱ्या अशा घटनेला आपण थांबवावे अशी मागणी कुलगुरूंना दिलेल्या तक्रारीत केली होती, असे त्यांनी सांगितले. २० जून रोजी मुलाखत घेण्यावरून वाद निर्माण झाला तेव्हा बोगस सह्या करून संस्थेचे सचिव बदले गेल्याचे लक्षात आले यावेळी आपण पोलिसात फिर्याद दाखल केली. या निवड प्रक्रियेसाठी १७१ उमेदवार मुलाखतीसाठी आले होते त्यापैकी ज्यांनी अगोदरच पैशाचा घोडेबाजार केला आहे फक्त त्या उमेदवाराच्या मुलाखती सविस्तर घेतल्या बाकीच्या मुलाखती प्रत्येकी एक ते दोन मिनिटात संपवल्या त्यामुळे बोगस निवड समितीने पैसे घेऊन निवडलेल्या उमेदवाराची निवड रद्द करावी अशी मागणी जोशी यांनी केली.

केत्तुर येथे शेतजमिनीच्या वादातून वडिलांना खून करण्याची धमकी

सुराज्य/सोलापूर

शेत जमिनीचा वाद न्यायप्रविष्ट असताना ऊसाची तोडणी का करतो? अशी विचारणा केली असता वृद्ध वडिलांना रिवाल्वरने खुताची धमकी देऊन लहान भावास उचलून आपटल्याची घटना केतुर (ता.करमाळा) येथे दुपारच्या सुमारास घडली.

या प्रकरणात करमाळ्याच्या पोलिसांनी वृद्ध शेतकऱ्यांचा मुलगा आणि अन्य तिघां विरुद्ध खुनाचा प्रयत्न आणि शस्त्र अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. या संदर्भात

मुलासह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

माधवराव तुळशीराम खाटमोडे (वय ८५ रा.केतुर) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी त्यांचा मोठा मुलगा मालोजी खाटमोडे, देविदास कोकणे, तानाजी पाठक आणि दादासाहेब रणदिवे (सर्व रा. केतुर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. माधवराव खाटमोडे (फिर्यादी) यांची केतुर येथील गट क्रमांक १०७ येथे समाईक शेती आहे. काल दुपारी १ वाजेच्या सुमारास त्यांचा मुलगा मालोजी खाटमोडे हा शेतातील ऊस यंत्र लावून तोडणी करीत होता. त्यावेळी माधवराव आणि त्यांचा लहान मुलगा लखोजी या दोघांनी जमीनिचा वाद न्यायप्रविष्ट असताना तु ऊसाची तोडणी का करतो ? अशी विचारणे केली. त्यावेळी मालोजी याने लहान भावास उचलून आपटले. त्यानंतर वृद्ध वडिलांच्या डोक्याला रिवाल्वर लावून ठार मारण्याची धमकी दिली. आणि त्याच रिवाल्वर ने वडीलांना ढकलून दिले. त्यात ते जखमी झाले. त्यानंतर वरील चौघांनी मिळून लखोजी खाटमोडे यांना काठीने मारहाण केली.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

संसद, बापरे! आमच्या वर्गात ही असं' होत नाही!

कल्याण
249-59-379

मुंबई
358-66-880

संसदेच्या इतिहासातील पहिल्यांदाच निलंबनाची मोठी कारवाई

सुराज्य/नवी दिल्ली

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात विरोधी पक्षांच्या खासदारांनी केलेल्या गदारोळामुळे मंगळवारी (१९ डिसेंबर) आणखी ४९ खासदारांना निलंबित करण्यात आले.त्यामुळे संसदेतून निलंबित करण्यात आलेल्या खासदारांची संख्या १४१ वर पोहोचली आहे. भारतीय संसदेच्या इतिहासात पहिल्यांदाच खासदारांवर करण्यात आलेली ही सर्वात मोठी कारवाई असल्याचे सांगण्यात आले.

राज्यसभा आणि लोकसभेतून निलंबित करण्यात आलेल्या सर्व खासदारांना संपूर्ण हिवाळी अधिवेशनाच्या कामकाजात सहभागी होता येणार नाही. सुप्रिया सुळे, मनीष तिवारी, शशी थरूर, मोहम्मद फैसल, कार्ती चिदंबरम, सुदीप बंदोपाध्याय, डिंपल यादव आणि दानिश अली यांच्यासह लोकसभेतील अनेक विरोधी खासदारांना संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या उर्वरित कालावधीसाठी निलंबित करण्यात आले आहे.

काही दिवसांपूर्वी संसदेची सुरक्षा भेदत काही तरुणांनी लोकसभेसह संसद भवनाच्या आवारात गोंधळ घातला. याचप्रकरणी केंद्रीय गृहमंत्र्यांनी सभागृहात उपस्थित राहून निवेदन द्यावे, अशी मागणी विरोधकांकडून केली जात आहे. तसेच, सर्व विरोधक आपल्या मागणीवर ठाम आहेत. संसदेच्या सुरक्षेत मोठी चूक झाल्याप्रकरणी केंद्रीय गृहमंत्र्यांच्या निवेदनाची विरोधकांची ठाम मागणी आहे.

संसदेची सुरक्षा भेदत काही दिवसांपूर्वी काही तरुणांनी घातलेल्या गोंधळबाबत विरोधकांकडून चर्चेची मागणी केली जात आहे. विरोधकांनी चर्चेची मागणी केल्यानंच एवढ्या मोठ्या प्रमाणावर खासदारांचं निलंबन करण्यात आल्याचा दावा विरोधकांनी केला आहे.

आणखी ४९ खासदारांना दाखवला कारवाईचा बडगा

कोणत्या खासदारांचं निलंबन?

मनीष तिवारी, चंद्रशेखर प्रसाद, डिंपल यादव, कार्ती चिदंबरम, एसटी हसन, सुप्रिया सुळे, शथी थरूर, दानिश अली, माला रॉय, राजीव रंजन सिंह, संतोष कुमार, प्रतिभा सिंह, मोहम्मद सादिक, जगबीर सिंह गिल, महाबली सिंह, एमके विष्णू प्रसाद, फारुख अब्दुल्ला, गुरजीत सिंह औजला, फजलुर रहमान, रवनीत सिंह बिट्टू, दिनेश यादव, के सुधाकरन, सुशील कुमार रिंकू.

ही तर अघोषित आणीबाणी... : विरोधी पक्षांच्या खासदारांवरची ही निलंबनाची कारवाई म्हणजे केंद्र सरकारची एक प्रकारे अघोषित आणीबाणी असल्याची टीका राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. दुष्काळ आणि सरकारच्या धोरणांमुळे पिचलेल्या शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी, कांदा–कापूस–सोयाबीन–दूधाच्या दरांचा प्रश्न सरकारला विचारायचा नाही तर कुणाला विचारायचा? शेतकऱ्यांचे म्हणणे जर सरकारपर्यंत मांडायचेच नसेल, बेरोजगारांची घुसमट सरकारला ऐकायचीच नसेल, महिला–मध्यमवर्गीयांचे प्रश्न या सरकारला ऐकायचेच नसतील तर ते मांडायचेच नाहीत का? असे सवालही त्यांनी उपस्थित केले.

जशास तसे... : काँग्रेसने हा विरोधकांचा आवाज बंद करण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप केला आहे. १९८९ मध्ये संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात एकाच दिवसात ६३ विरोधी खासदारांना निलंबित करण्यात आले होते. त्यावेळी केंद्रात राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचे सरकार होते. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हत्येची चौकशी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या न्यायमूर्ती खासदार ठक्कर आयोगाचा अहवाल सार्वजनिक करण्याची मागणी विरोधी पक्षांनी सरकारकडे केली होती. भाजपची ही कारवाई म्हणजे जशास तसे उत्तर असल्याचे मानले जात आहे